आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

८ ऑक्टोबर २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- डिजिटल संपर्कामुळे शिक्षण, आरोग्य आणि शासकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- जीएसटी परिषदेची ५७वी बैठक नवी दिल्लीत सुरु

- औषध उत्पादक कंपन्यांच्या विपणन धोरणाचं नियमन करण्याविषयी समिती स्थापन करावी असे सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला निर्देश

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांच्या निधनानंतर सर्वत्र शोकाकुल वातावरण

<><><><><>

डिजिटल कनेक्टिव्हिटीनेमुळे शिक्षण, आरोग्य आणि शासकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत 'यशोभूमी' इथं १० व्या IMC, अर्थात 'इंडिया मोबाइल काँग्रेस' चं उदघाटन करताना बोलत होते. 'स्केल विदाऊट बाउंडरीज' ही IMC 2026 ची संकल्पना आहे. दूरसंचार, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि तंत्रज्ञान विषयक नवोन्मेष या क्षेत्रांमधली भारताची उल्लेखनीय प्रगती प्रदर्शित करण्याच्या उद्देशानं हा चार दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात आज ५जी कनेक्टिव्हिटी पोहोचली असून, दुर्गम खेड्यातल्या सर्वसामान्य जनतेला दर्जेदार माहिती सहज उपलब्ध होत असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**- - - होल्ड बाईट - - -**

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं ५७वी जीएसटी परिषद बैठक आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, तसंच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री या बैठकीत सहभागी होत आहेत. जीएसटी अनुपालनासाठी

लागणारा वेळ आणि खर्च कमी करण्याच्या उद्देशानं, जीएसटीशी संबंधित विवाद सोडवण्यासाठी तसंच 'इनपुट टॅक्स क्रेडिट'चा प्रवाह सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक सुधारणांवर या बैठकीत चर्चा होईल. वस्तू आणि सेवा कर प्रणालीतल्या पुढल्या टप्प्यातल्या सुधारणांसाठी सरकार पाच-सूत्री योजनांचा प्रस्ताव ठेवणार असून, यात प्रक्रियात्मक सुधारणा, संरचनात्मक सुधारणा, जीवनमान आणि व्यवसाय सुलभता, सेवांची निर्यात आणि ई-कॉमर्स या मुद्द्यांचा समावेश आहे. जीएसटी प्रणालीतल्या सध्याच्या अनेक प्रशासकीय अडचणींचं सुलभीकरण, आणि विशेषतः लघु उद्योगांवरचा अनुपालनाचा भार कमी करणं, हे या सुधारणांचं उद्दिष्ट असल्याचं अर्थमंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><>**

भारतीय हवाई दलाचा ९४ वा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. ‘अभेद्य, अचूक आणि सटीक’ ही यंदाची हवाई दल दिनाची संकल्पना आहे. भारतीय हवाई दल संपूर्ण सजगतेनं आणि दृढनिश्चयानं राष्ट्राच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असल्याचं हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी म्हटलं आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’नं एकात्मिक हवाई मोहिमांच्या निर्णायक सामर्थ्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केलं, तसंच देशाचं सार्वभौमत्व सुरक्षित राखण्याची भारतीय हवाई दलाची क्षमता सिद्ध केली, असं त्यांनी नमूद केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर विशेष व्हिडिओ शेअर करत, वायू दलाच्या शौर्य आणि समर्पणाला अभिवादन केलं आहे.

**<><><><>**

औषध उत्पादन कंपन्या विपणनासाठी डॉक्टरांना भेटवस्तू किंवा इतर लाभ देण्याबरोबरच ज्या इतर गोष्टी करतात, त्यांच्यावर वैधानिक नियमन आणायची गरज आहे का, याची चाचपणी करण्यासाठी ३ सदस्यांची समिती स्थापन करायचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. या कंपन्या आणि डॉक्टर यांच्यातल्या अयोग्य व्यवहारांवर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेताना न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी हे निर्देश दिले. ही समिती सर्व संबंधितांचं म्हणणं विचारात घेऊन असं नियमन गरजेचं आहे का, आणि असेल तर त्यांचं स्वरूप काय असावं, याबाबतची शिफारस करेल.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला आज २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने  होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रावस सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहेत स्वच्छता अभियानाबद्दल

**- -  व्हॉईस कास्ट - - - -**

*(प्रधानमंत्रीपदाची सूत्रं नरेंद्र मोदी यांनी २०१४ मधे स्वीकारल्यावर त्याच वर्षी २ ऑक्टोबर रोजी गांधीजयंतीच्या दिवशी महात्मा गांधींचा स्वच्छतेचा संदेश देणारं देशव्यापी स्वच्छता अभियान सुरु झालं. घनकचरा व्यवस्थापन, परिसर स्वच्छता आणि उघड्यावर शौचापासून मुक्तता या महत्त्वाच्या उपाययोजना करुन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. स्वच्छतेचा आग्रह धरणाऱ्या कार्यकर्त्यांना  स्वच्छाग्रही असं संबोधून प्रधानमंत्र्यांनी त्यांचा गौरव केला. या अभियानासाठी वेगळी आर्थिक तरतूद करण्यात आली.  परिणामतः ग्रामीण भागात सुमारे १० कोटी २८ लाख शौचालयं बांधण्यात आली. ६ कोटी ३ लाख १७५ गावं हागणदारीमुक्त झाली.)*

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेता नाना पाटेकर यांचं आज हृदयविकारानं निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. गोव्यात दोना पावला इथल्या त्यांच्या घरात आज पहाटे चारच्या सुमाराला ते बेशुद्धावस्थेत आढळले. त्यांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारांना प्रतिसाद न दिल्यानं पहाटे सव्वा पाचच्या सुमाराला त्यांना मृत घोषित करण्यात आलं. नाना यांचा मृतदेह पोस्टमार्टेमसाठी गोवा वैद्यकीय रुग्णालयात नेण्यात आला आहे. त्यानंतर त्यांचं पार्थिव पुण्यात डोणजे इथे त्यांच्या घरी नेला जाईल आणि पुण्यातच त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. नाना पाटेकर यांच्या निधनामुळे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे. ऐकूया त्यांच्या जीवनकार्याविषयी अधिक माहिती….

**-   - -  व्हॉईस कास्ट- - -**

*(नाना पाटेकर यांचं मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. त्यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी कोकणात मुरुड इथे झाला होता. मुंबईतल्या जेजे स्कूल ऑफ आर्ट्सचे ते विद्यार्थी होते. नाना यांनी आपली अभिनय कारकीर्द मराठी रंगभूमीवरून सुरू केली. हमिदाबाईची कोठी या नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केलं. जयवंत दळवी यांच्या पुरुष या नाटकातला त्यांचा खलनायक गाजला. १९७८मध्ये आलेल्या गमन या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. अंकुश, प्रतिघात, सलाम बॉम्बे, थोडासा रूमानी हो जाए, प्रहार, राजू बन गया जेंटलमन, तिरंगा, क्रांतिवीर, यशवंत, अग्निसाक्षी, परिंदा, खामोशी, वेलकम, अबतक छप्पन अशा गाजलेल्या चित्रपटांमधून विविध रंगी भूमिका साकारत त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केलं. प्रहार या चित्रपटाचं दिग्दर्शनही नाना पाटेकर यांनी केलं होतं. सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता, मुख्य अभिनेता असे विविध श्रेणीतले फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाले. केंद्र सरकारने त्यांना २०१३मध्ये पद्मश्री देऊन गौरवलं होतं. महाराष्ट्रातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी स्थापन झालेल्या नाम फाऊंडेशनचे ते संस्थापक सदस्य होते. १९९९मध्ये कारगिल युद्धाच्या काळात आपली अभिनय कारकीर्द काही काळासाठी बाजूला ठेवून ते दोन महिने सैनिकांसोबत राहिले होते.)*

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी दुःख व्यक्त केलं आहे. नाना पाटेकर यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून मानवी जीवनातले विविध पैलू जिवंत केल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. नाना पाटेकर हे अष्टपैलू, प्रतिभावंत कलाकार होते, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे.

नाना पाटेकर यांनी उत्तम कलाकार होते. त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारत रसिकांची मनं जिंकली. त्यांनी स्वतःवर कोणतीही बंधनं लादली नाहीत. त्यांनी समाजातल्या व्यवस्थेवर आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून बोचरी टीका केली.

नाना पाटेकर यांच्या दमदार भूमिका आणि चित्रपटसृष्टीतील योगदानाची सदैव आठवण ठेवली जाईल, अशा शब्दांत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे की, नाना पाटेकर यांच्या निधनामुळं रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि समाजाची मोठी हानी झाली आहे. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी सुरू केलेलं कार्य निर्धाराने पुढे नेणं ही त्यांना श्रद्धांजली ठरेल, असंही त्यांनी नमूद केलं.

भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेलं काम हे सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श होता.

विविध क्षेत्रातूनही अनेक मान्यवरांनी नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

//<><><><><>//